# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

(स्थानिक गुन्हे शाखा,सातारा)

दुरध्वनी क्रमांक - ०२१६२-२३३९२३ फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०२३२ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


## प्रेसनोट

दिनांक २२ ऑगष्ट २०२२

( स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई.)

महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला गुटखा (पान मसाला,सुगंधी तंबाखू व आरएमडी) वगैरे असा एकुण २४,५०,०००/- रुपयेचा माल जप्त .

---

श्री.अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी महाराष्ट्र राज्यात बंदी असलेल्या गुटख्याची वाहतुक करण व बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना श्री.किशोर धुमाळ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,सातारा यांना सूचना दिलेल्या आहेत.

दिनांक २२/८/२०२२ रोजी पेट्रोलींग दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा,सातारा कडील पथकास बातमी मिळाली की, पुसेगांव - सातारा रोडने पिकअप गाडी क्रमांक एम.एच.१४ जी.एल./८८२१ मधून महाराष्ट्र शासनाने राज्यात वाहतुक, बाळगण्यास, व विक्रीस बंदी असलेला गुटखा घेवून वाहतुक करीत आहे. अशी बातमी मिळाल्याने सदर पथक पुसेगांव गांवचे हद्दीत सापळा लावून थांबले असता, दिनांक २२/८/२०२२ रोजी रात्री ०१.०० वा.सुमारास महिंद्रा पिकअप गाडी क्रमांक एम.एच.१४ जी.एल./८८२१ ही पुसेगांव बाजूकडुन आली त्यावेळी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी पिकअप गाडीस थांबण्याचा इशारा केला असाता पिकअप गाडी चालकाने गाडी न-थांबवता तो तसाच वेगात पळून गेला. तेव्हा पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री.मदन फाळके, सहायक फौजदार दिपक मोरे, महिला पोलीस अंमलदार श्रीमती मोनाली निकम, पोलीस अंमलदार प्रमोद सावंत, गणेश कापरे, अमित सपकाळ, शिवाजी गुरव यांनी पिकअप गाडीचा पाठलाग करुन गाडी खावली ता.जि.सातारा गांवचे हद्दीत पकडली आहे. सदर गाडीमध्ये १९,५०,०००/- रुपये किंमतीचा गुटखा (पान मसाला, सुगंधी तंबाखू, आर.एम.डी.) व इतर माल असा एकुण २४,५०,०००/- रुपयेचा माल पकडला असून सदर बाबत सातारा शहर पोलीस ठाण्यास गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाईमध्ये श्री अजयकुमार बंसल, पोलीस अधीक्षक सातारा, श्री अजित बोऱ्हाडे, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांच्या सूचनाप्रमाणे व श्री किशोर धुमाळ, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांच्या अधिपत्याखाली सपोनि रमेश गर्जे, पोउनि मदन फाळके, पोउनि अमित पाटील, पोलीस अंमलदार दिपक मोरे, उत्तमराव दबडे, तानाजी माने, विजय कांबळे, संतोष सपकाळ, संजय शिर्के, संतोष पवार, अतिश घाडगे, शरद बेबले, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, प्रमोद सावंत, अमित सपकाळ, श्रीमती मोनाली निकम, मुनीर मुल्ला, निलेश काटकर, गणेश कापरे, प्रविण कांबळे, मोहन पवार, विशाल पवार, रोहित निकम, पृथ्वीराज जाधव, वैभव सावंत, सचिन ससाने, चापोहवा शिवाजी गुरव यांनी सहभाग घेतला असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक सातारा तसेच अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

---

(पोलीस अधीक्षक सातारा यांचे मान्यतेने )

प्रति,

सर्व संपादक...



स्थानिक गुन्हे शाखा, सातारा
C.C.T.N.S.
OFFICE
MH 14 JL 8821